लो.टि.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई दि.०७/०१/२०२२

# -: प्रेस नोट:-

| | | |
|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे | लो टि मार्ग पोलीस ठाणे. |
| २ | वि.स्था.गु.नों.क्र व कलम | वि.स्था.गु.नों.क्र. ०१/२२,कलम-१२०(ब),३४ भादवि. सह कलम-३,२५ भा.ह.का. सह कलम -३७ (१)(अ), १३५ मपोका |
| ३ | गुन्हा घडला दिनांक व वेळ | दि.०२/०१/२०२२ रोजी १९:४५ वा. |
| ४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दि.०२/०१/२०२२ रोजी २०:४५ वा. |
| ५ | गुन्हयाचे ठिकाण | भाई जीनवजी लेन, स.का.पाटील उद्यानाच्या उत्तर बाजूस फुटपाथ कॉर्नर जवळ, एम.के.रोड, मुंबई-४०० ००२ |
| ६ | फिर्यादीचे नांव | श्री. दयानंद रघुनाथ जाधव, सपोनि.,नेमणूक लो.टि.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई. |
| ७ | हस्तगत अग्निशस्त्र | ५ देशी बनावटीचे पिस्टल व १० जिवंत काडतूस **एकुण किं. रू.१,२६,०००/-** |
| ८ | अटक आरोपी | १) प्रदीप रमेश वासनीक, वय ३२ वर्षे,<br>२) इम्तीयाज हातीम खान, वय २५ वर्षे<br>३) संजय नागजीभाई चित्रोडा, वय ३६ वर्षे<br>४) रोशन सुरेश पाचे, वय २४ वर्षे,<br>५) राहूल हरिशंकर भौतिक, वय २९ वर्षे |
| ९ | पाहिजे आरोपी | दर्शन सिंग (शिख इसम/सरदार) |

**<u>गुन्हयाची थोडक्यात हकीकत</u>**- दिनांक ०२/०१/२०२२ रोजी पोउनि अरूण जाधव, नेमणूक पायधुनी पोलीस ठाणे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे श्री.समीर शेख, मा.सपोआ, पायधुनी विभाग यांचे नेतृत्वाखाली पायधुनी पोलीस ठाणे व लो.टि. मार्ग पोलीस ठाणे याची संयुक्त पोलीस पथके तयार करून भाई जीनवजी लेन, स.का.पाटील उद्यानाच्या उत्तर बाजूस फुटपाथ कॉर्नर जवळ, एम.के.रोड, मुंबई-४०० ००२ येथे सापळा रचून सदर ठिकाणी १९:४५ वा.चे सुमारास एक संशयीत इसम हातात एक पिवळया रंगाची पिशवी घेवुन आला. सदरचा इसमाच्या हालचाली संशांयास्पद असल्याने त्यास तात्काळ ताब्यात घेवुन पंचांच्या मदतीने त्यांची झडती घेतली असता सदर इसमाकडे एकुण ५ देशी बनावटी पिस्टल व १० जिवंत काडतुसे मिळाली. सदर इसमाचे नांव **प्रदिप रमेश वासनिक वय ३२ वर्षे, धंदाः पेंन्टर, रा.ठी. रुम नं. ४६, वैशाली नगर,बस स्टॉप जवळ,हिंगणा, नागपुर** असे असून बेकायदेशीर रित्या अग्नीशस्त्रे व दारुगोळा विनापरवाना कब्जात बाळगल्याने त्याचे विरुध्द सरकार तर्फे सहाय्यक पोलीस निरीक्षक दयानंद जाधव, लो.टि. मार्ग पोलीस ठाणे यांची फिर्याद नोंदवुन उपरोक्त प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**तपास** -अटक आरोपी प्रदिप रमेश वासनिक यांस विश्वासात घेवून त्याच्याकडे कौशल्यपूर्ण तपास केला असता अटक आरोपीने सदर गुन्हयात वर नमूद देशी बनावटीच्या ०५ पिस्टल व १० जिवंत काडतूसे त्याचा साथीदार संजय नागजीभाई चित्रोडा याचे सांगण्यावरून नागपूर येथून रोशन पाचेयाचेकडून ताब्यात घेऊन मिरा रोड, ठाणे येथे आणली असल्याचे सांगितले. तसेच सदरची ०५ पिस्टल व १० जिवंत काडतूसे रोशन पाचे नामक व्यक्तीने त्याचा साथीदार इमतियाज हातिम खान याचे ओळखीच्या बालाघाट, मध्यप्रदेश येथील दर्शन सिंग कडून विकत घेतल्याची माहिती दिली.

उपरोक्त माहितीच्या आधारेगुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी सपोनि. नितिन कदम व पथक तपासकामी नागपूर येथे रवाना केले व एक पथक कांदिवली, बोरीवली, दहिसर परिसरात तपासकामी रवाना केले. **आरोपी संजय नागजीभाई चित्रोडा व इस्तीयाज हातीम खान** हे सदर गुन्ह्यातील मुख्य सुत्रधार असून त्यांनीच रोशन पाचे, राहुल भौतिक, प्रदिप वासनीक यांचेशी आपसांत संगणमत करून फौजदारीपात्र कट रचून देशी बनावटीचे पिस्टल व जिवंत काडतूस बालाघाट, मध्य प्रदेश येथील दर्शन सिंग या शिख इसमाकडून विकत घेवून ती पुढे विक्री करण्याच्या उद्देशाने मुंबई येथे आणली असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

गोपनीय बातमीदाराकडून आरोपी संजय चित्रोडा हा सदर गुन्ह्यातील मुख्य सुत्रधार असून तो इस्तीयाज खान,रोशन पाचे व राहुल भौतिक यांचे मदतीने बालाघाट, मध्यप्रदेश येथून अवैदय शस्त्र व दारूगोळा विक्री करीता घेवून येत असल्याची माहिती मिळून आली.

**आरोपी संजय नागजीभाई चित्रोडा, वय २६ वर्षे व इस्तीयाज हातीम खान, वय २५ वर्षे** यांना दि. ०४/०१/२०२२ रोजी गुप्त बातमीदारांच्या मदतीने गुन्हे प्रकटीकण पथकाच्या एका पथकाने मीरा रोड येथून ताब्यात घेतले तसेच दुसऱ्या पोलीस पथकाने **आरोपी रोशन सुरेश पाचे, वय २४ वर्षे व राहुल हरिशंकर भौतिक, वय २९ वर्षे** यांनादि.०५/०१/२०२२ रोजी पंचशील नगर, नागपूर येथून ताब्यात घेवून पोलीस ठाण्यास आणले. नमूद आरोपींकडे केलेल्या चौकशीमध्ये त्यांनी गुन्ह्यांची कबूली दिल्याने व त्यांचा गुन्ह्यातील सहभाग निश्चित झाल्याने त्यांना सदर गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे. नमूद आरोपींचा गुन्हेगारी अभिलेख पडताळला असता त्यांच्यावर महाराष्ट्रात तसेच मध्य प्रदेश येथे खालीलप्रमाणे गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे.

**१) आरोपी - प्रदीप रमेश वासनिक याचे विरोधातील गुन्हे**

१) २०१३ राणा प्रताप नगर पोलीस ठाणे, नागपूर कलम ४,२५ भाहका.

२) २०१५ एमआयडीसी पोलीस ठाणे, नागपूर दारू वाहतुक करताना मिळून आला.

३) गु.र.क्र. ३०९२/२०१० कलम १८४, १८५ मोटर वाहन कायदा-इमामवाडा पोलीस ठाणे, नागपूर

४) गु.र.क्र. ३१३४/२०१४, कलम -११७, १७७, १२२मोटर वाहन कायदा-इमामवाडा पोलीस ठाणे,नागपूर

**२) आरोपी - इस्तीयाज हातीम खान याचे विरोधातील गुन्हे**

१) गु.र.क्र. ८८/२०१८ कलम ३८० भादंविआंधळगांवपोलीसठाणे, भंडारा

२) गु.र.क्र. ४३/२०१८ कलम ३९४ भादंविहत्तापोलीसठाणे, बालाघाट, मध्य प्रदेश

३) गु.र.क्र.३९५/२०१८ कलम ३९५ भादंविबेहलापोलीसठाणे, बालाघाट, मध्य प्रदेश

**(सन २०१८ पासूनबालाघाट, मध्य प्रदेश येथीलजेल मध्ये आतहोता, सध्या सप्टेंबर, २०२१ मध्ये तुरूंगातून बाहेर)**

**३) आरोपी - संजय नागजीभाई चित्रोडा याचे विरोधातील गुन्हे**

१) गु.र.क्र. १४१७/२०१६, कलम- ४२०, ३४ भादंवि-नवघरपोलीसठाणे, मुंबई

२) गु.र.क्र. २१९/२०२१, कलम -३, २५ भाहका-किरणपुरपोलीस, बालाघाट, मध्य प्रदेश

**४) आरोपी रोशन पाचे याचे विरोधातील नोंद गुन्हे** :-

१) गु.र.क्र. ८९/२०१९ कलम ४५४, ४५७, ३८०, ३४ भादंवि - सोनेगांव पोलीस ठाणे, नागपूर

२) गु.र.क्र. २४५/२०१५ कलम ३७९ भादंवि - राणाप्रताप पोलीस ठाणे, नागपूर

३) गु.र.क्र. २६२/२०१९ कलम ३७९, ५११ भादंवि - खापा पोलीस ठाणे, नागपूर
४) गु.र.क्र. १४८/२०१९ कलम ३७९, ३४ भादंवि - सोनेगांव पोलीस ठाणे, नागपूर
५) गु.र.क्र. २८५/२०१७ कलम ३९५, १०९, १२०(ब) भादंवि - गोरेगांव पोलीस ठाणे, नागपूर
६) गु.र.क्र. १५०/२०१९ कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि - बेलतरोडी पोलीस ठाणे, नागपूर
७) गु.र.क्र. १०५/२०१९ कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि - बेलतरोडी पोलीस ठाणे, नागपूर
८) गु.र.क्र. १५६/२०१९ कलम ३७९, ३४ भादंवि - राणाप्रताप पोलीस ठाणे, नागपूर
९) गु.र.क्र. २६७/२०१९ कलम ३७९ भादंवि - सिताबर्डी पोलीस ठाणे, नागपूर
१०) गु.र.क्र. २६१/२०२० कलम १६० भादंवि - राणाप्रताप पोलीस ठाणे, नागपूर

**५) आरोपी राहुल हरीशंकर भौतिक याचे विरोधातील नोंद गुन्हे** :-
१) गु.र.क्र. ३९४/२०१६ कलम ३०२, १२० (ब) भादंवि - राणाप्रताप पोलीस ठाणे, नागपूर
२) गु.र.क्र. ७६/२०१७ कलम ४, २५, ३४ भाहका - राणाप्रताप पोलीस ठाणे, नागपूर
३) गु.र.क्र. ३०९/२०१७ कलम १३५ मुंबई पोलीस ॲक्ट - राणाप्रताप पोलीस ठाणे, नागपूर
४) गु.र.क्र. १६३/२०१७ कलम ३७९ भादंवि - राणाप्रताप पोलीस ठाणे, नागपूर

लो.टि.मार्ग पोलीस ठाण्याकडून गोपनीय माहितीच्या आधारे सापळा रचून अवैद्य शस्त्र व दारूगोळा जप्तीची कारवाई करण्यात आलेली आहे. सदरची संपूर्ण कारवाई ही मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. हेमंत नगराळे यांचे मार्गदर्शनाखाली व मा.पोलीस सह आयुक्त,कायदा व सुव्यवस्था, बृहन्मुंबई श्री. विश्वास नांगरे पाटील, मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई श्री. दिलीप सावंत, मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, मुंबई डॉ. सौरभ त्रिपाठी यांचे देखरेखीखाली मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,पायधुनी विभाग, मुंबई व वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिपक निकम यांचे नेतृत्व व प्रत्यक्ष सहभागात पार पडली आहे. पोलीस निरीक्षक,गुन्हे श्री. ओम वगांटे हे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि.सचिन माने, सपोनि. नितिन कदम, पोलीस उप निरीक्षक अरूण जाधव, पोलीस उप निरीक्षक प्रदिप लाड व गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या मदतीने सदर गुन्हयाचा अधिक तपास करीत आहेत.

(दिपक निकम)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
लो.टि.मार्ग पोलीस ठाणे,मुंबई.